**Awards/recognitions**

- *MARATHI ENTREPRENEUR NETWORK FORUM PUNE-*

" ADARSH UDYJIKA AWARD - 5 JUNE 2019--- Photos







**Address 1:-Sr.No.50/2/9, Gujarwadi Road, Katraj, Pune-411046, Maharashtra(India).**
**Mo-9325879944/45**
**Email: - climbersystems@gmail.com, gosaviujwala@gmail.com,website: www.climberengineers.com**

# ‘मराठी माणसाने हिमतीने उद्योग उभारावेत’

म. टा. प्रतिनिधी, पुणे

‘कोणत्याही क्षेत्रात काम करताना आव्हाने येतात. उद्योग उभारताना आव्हानांचा सामना करावा लागतो. अपयशाला सामोरे जावे लागते; पण या परिस्थितीतून सकारात्मक मार्ग काढत जिद्दीने उभे राहणारेच यशस्वी उद्योजक होतात. त्यामुळे मराठी माणसाने हिमतीने उद्योग उभारावेत,’ असे मत युनिव्हर्सल कन्स्ट्रक्शनचे व्यवस्थापकीय संचालक रणजित मोरे यांनी व्यक्त केले.

मराठी आंत्रप्रेन्युअर्स नेटवर्क फोरमच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित ‘आदर्श उद्योजक-उद्योजिका पुरस्कार’ वितरण सोहळ्यात मोरे बोलत होते.

नेहरू सांस्कृतिक सभागृहात झालेल्या या कार्यक्रमासाठी शारंगधर फार्माचे डॉ. जयंत अभ्यंकर, फोरमचे राजेश जोशी, सुरेंद्र कुलकर्णी, नंदकुमार तळेकर, वृषभनाथ कोंडेकर आदी उपस्थित होते. या वेळी सेवा क्षेत्रातील जीवन हेंद्रे, उत्पादन क्षेत्रातील प्रकाश दीक्षित, कृषी उद्योगातील उत्तम हुकरे यांना आदर्श उद्योजक, तर उत्पादन क्षेत्रातील उज्ज्वला गोसावी आणि खाद्य क्षेत्रातील प्राजक्ता पाठक यांना आदर्श उद्योजिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



मराठी आंत्रप्रेन्युअर्स नेटवर्क फोरमच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त ‘आदर्श उद्योजक-उद्योजिका पुरस्कार’ वितरण सोहळा आयोजिण्यात आला होता.

> **मराठी माणूस प्रामाणिक असतो. तो ग्राहकाला कधी फसवण्याचा विचार करत नाहीत. जोखीम घेण्याची तयारी आपल्याकडे असली पाहिजे. प्रत्येक वेळी यश मिळेल, असे नाही. अपयश आले, तरी खचून न जाता पुन्हा जोमाने उभा राहिले पाहिजे. महाराष्ट्रात उद्योगासाठी मोठा वाव आहे. आपण मार्केटचा अभ्यास करून त्यानुसार उद्योग विस्तार करायला हवा.**
>
> – **रणजित मोरे**, व्यवस्थापकीय संचालक, युनिव्हर्सल कन्स्ट्रक्शन

डॉ. अभ्यंकर म्हणाले, ‘आपल्यातील क्षमता ओळखून त्यानुसार क्षेत्रनिवड केली पाहिजे. त्यात नावीन्यपूर्ण काम उभे करता आले पाहिजे. उद्योगाच्या यशासाठी पैसे, विश्वास आणि कामावरची श्रद्धा या तीन गोष्टी महत्त्वाच्या असतात. अपयशातून मार्ग काढून, पुढे गेले पाहिजे.’

पाठक म्हणाल्या, ‘आमच्यासारख्या उद्योगांना दाद दिली, तर आमचाही काम करण्यासाठी उत्साह वाढतो. हे यश केवळ माझे नाही, तर माझ्या कर्मचाऱ्यांचे आहे.’ पुरस्कारार्थींनीही मनोगत व्यक्त केले. ज्ञानेश्वर जाधवर यांनी सूत्रसंचालन आणि कोंडेकर यांनी प्रास्ताविक केले. जाई देशपांडे यांनी मानपत्राचे वाचन केले. राजश्री माने यांनी उपस्थितांचे मानले.

+

**Address 1:-Sr.No.50/2/9, Gujarwadi Road, Katraj, Pune-411046, Maharashtra(India).**
**Mo-9325879944/45**
**Email: - climbersystems@gmail.com, gosaviujwala@gmail.com,website: www.climberengineers.com**

- *MARATHA CHAMBER OF COMMERCE , INDUSTRIES AND AGRICULTURE (MCCIA )-*

"Ramabai Joshi Award For Woman Entrepreneur2019" for Product- 'Rice De husking Machine







–

**Address 1:-Sr.No.50/2/9, Gujarwadi Road, Katraj, Pune-411046, Maharashtra(India).**
**Mo-9325879944/45**
**Email: - climbersystems@gmail.com, gosaviujwala@gmail.com,website: www.climberengineers.com**










CLIMBER SYSTEMS

**Address 1:-Sr.No.50/2/9, Gujarwadi Road, Katraj, Pune-411046, Maharashtra(India).**
**Mo-9325879944/45**
**Email: - climbersystems@gmail.com, gosaviujwala@gmail.com,website: www.climberengineers.com**

MCCIA Publicity Clippings

| | |
|---|---|
| Date | 4/12/2019 |
| Publication | अॅग्रोवन |
| Page No | 04 |
| Supplement/ Segment | – |

# मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या पुरस्कारांची घोषणा

## डॉ. अभय फिरोदिया यांच्या हस्ते गुरुवारी होणार वितरण

**पुणे (प्रतिनिधी)** : मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अॅण्ड अॅग्रिकल्चरच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा रमाबाई जोशी महिला उद्योजक पुरस्कार घरगुती तांदळाच्या मिलच्या उत्पादक क्लायंबर सिस्टीमच्या उज्ज्वला गोसावी यांना जाहीर झाला आहे. चेंबरचे अध्यक्ष प्रदीप भार्गव आणि महासंचालक प्रशांत गिरबने यांनी मंगळवारी (ता. ३) पत्रकार परिषदेमध्ये विविध पुरस्कारांची घोषणा केली.



उज्ज्वला गोसावी

गुरुवारी (ता. ५) सायंकाळी ६ वाजता बालगंधर्व रंगमंदिरात पुरस्कार वितरण कार्यक्रम फोर्स मोटर्सचे अध्यक्ष डॉ. अभय फिरोदिया यांच्या हस्ते होणार आहे.

विविध पुरस्कार पुढीलप्रमाणे : डॉ. आर. जे. राठी हरित पुढाकार पुरस्कार : सुनील नाईक, प्रमोज वैद्य (जाबील सर्किट इंडिया प्रा. लि.), बी. जी. देशमुख उद्योगांचे सामाजित दायित्व पुरस्कार : कृष्णन कोमंदूर (आदर पूनावाला क्लीन सिटी), सपना राठी (विंडसर शेल्टर्स), रितू छाब्रिया (मुकुल माधव फाउंडेशन), रमाबाई जोशी महिला उद्योजक पुरस्कार : उज्ज्वला गोसावी (क्लायंबर सिस्टीम), प्रीती रासकर (रायका इंजिनिअरिंग सोल्युशन्स), किरण नातू उद्योजकता पुरस्कार : आशुतोष गोखले (ऑलिमॅक्स सिस्टीम), यतीन तांबे (फ्रिक्शन वेल्डिंग), जी. एस. पारखे पुरस्कार : प्रशांत पानसरे (इन्टेलिमेनंटर टेक्नॉलॉजिस), विजय देशपांडे (सॅम इंटरग्रेशन), सुबोध जोशी (सुव्हिरॉन इक्विपमेंटस)

### तांदळाच्या घरगुती मिलविषयी

शेतकऱ्यांना घरातच साळीपासून तांदूळ तयार करता यावा यासाठी घरगुती मिल तयार करण्यात आली आहे. या मिलद्वारे हातसडीच्या तांदळांच्या दर्जाचा तांदूळ तयार होत असल्याचे गोसावी यांनी सांगितले. एका तासामध्ये २० किलो साळ भरडण्याची क्षमता मशिनची असून, ही मशिन सौरऊर्जेवर देखील चालू शकणार आहे.

CLIMB

Rotary Pune North – “WOMAN ENTREPRENEURE AWARD 2021”



CLIMBE

**Address 1:-Sr.No.50/2/9, Gujarwadi Road, Katraj, Pune-411046, Maharashtra(India).**
**Mo-9325879944/45**
**Email: - climbersystems@gmail.com, gosaviujwala@gmail.com,website: www.climberengineers.com**